19-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 18-03-2025 22:28 Page 1

निवडक

मये : महोत्सवासाठी मैदानाची पाहणी करताना आमदार प्रेमेंद्र शेट. दीपक नार्वेकर व अधिकारी.

मये लेकच्या प्रसिद्धीसाठी 'मये महोत्सवा'चे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १८ : एके काळी जागतिक पर्यटन नकाशावर स्थान असलेल्या मये तलावाला नवीन साज चढवून तसेच सर्व तऱ्हेच्या साधनसुविधा उपलब्ध करून देखील या स्थळाची व्हावी तशी प्रसिद्धी झाली नाही. परिणामी इथे पर्यटकांची संख्या रोडावली. याची दखल घेऊन आमदार प्रेमेंद्र शेट यांनी सरकारला दिलेल्या प्रस्तावानंतर गोवा पर्यटन विकास महामंडळातर्फे मये येथे भव्य मये महोत्सवाचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. या संदर्भात झालेल्या बैठकीत येत्या ५ एप्रिल रोजी मये तलावाच्या बाजूलाच असलेल्या तांत्रिक महाविद्यालयाच्या मैदानावर या महोत्सवाचे आयोजन करण्याचे ठरले. या बैठकीत आमदार प्रेमेंद्र शेट यांच्यासह पर्यटन महामंडळाचे उप व्यवस्थापक दीपक नार्वेकर, डिचोली पोलिस स्थानकाचे उप अधीक्षक जीवबा दळवी, पोलिस निरीक्षक , महाविद्यालयचे प्राचार्य, संयुक्त मामलेदार व इतर अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर नियोजित मैदानाची पाहणी करून एकंदर महोत्सवाच्या तयारीसाठी आढावा घेण्यात आला. मये तलावाला पुनर्वभव प्राप्त करून देण्याच्या हेतूने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे आमदार शेट यांनी यावेळी सांगितले. या महोत्सवात संपूर्ण दिवसभर विविध मनोरंजनात्मक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असेल, जनतेने मोठ्या संख्येने या महोत्सवात भाग घ्यावा, असे आवाहन आमदार प्रेमेंद्र शेट यांनी केले आहे. मये तलावाबरोबर या महोत्सवातून सप्तकोटेश्वर मंदिर तसेच नार्वे येथील पंचगंगेच्या तीरावर साकारणारा सरिता प्रकल्प तसेच चोडण येथील सलीम अली पक्षी अभयारण्य या स्थळांचे एक सर्किट तयार होऊन मये मतदारसंघाचा येणाऱ्या काळात पर्यटनदृष्ट्या प्रसार होणार असल्याचे दीपक नार्वेकर यांनी या वेळी सांगितले.

पणजी शिमगोत्सव समितीतर्फे आजपासून विविधरंगी कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : पणजी शिमगोत्सव समितीतर्फे आझाद मैदानावर उभारलेल्या भव्य रंगमंचावर बुधवार दि. १९ रोजीपासून विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रारंभ होत आहे.१९ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता पणजी शिगमोत्सव समितीचे कार्याध्यक्ष मंगलदास नाईक यांच्या हस्ते विधिवत रंगमंच पूजन होईल, त्यानंतर ७ वाजता सत्यवान नाईक प्रस्तुत ओंकार मेलोडिज ऑर्केस्ट्रा सादर होणार आहे. यात इंडियन आयडॉल फेम मयबाम कुंजराज (मणिपूर), दीपश्री शानभाग (मुंबई), ऋतुजा लोटलीकर, प्रतिक्षा कोरगावकर, प्रसन्ना भेंडे व अरिफ सय्यद (गोवा) हे गाणार आहेत. स्वाती व सेजल यांचा नृत्य आविष्कार असेल.

तेंबी भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : तेंबी ट्रान्सफोरमर केंद्रावर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २० रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत तेंबी, मोंजन आफ्रामेंत भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे वागुळे ट्रान्सफॉर्मर केंद्रावर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २१ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत वागुळे पीडव्ल्युडी टँक भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

उत्तर जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे मेरशी येथे स्थलांतर

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : उत्तर जिल्हा आणि सत्र न्यायालय आणि दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचे तिसवाडी येथील मेरशी येथील नवीन प्रकल्पात स्थलांतर करण्यात आले आहे. उत्तर जिल्हा आणि सत्र न्यायालय आणि दिवाणी आणि फौजदारी न्यायालयासंबंधी करावयाचा पत्रव्यवहार जिल्हा आणि सत्र न्यायालय, उत्तर गोवा, नवीन जिल्हा न्यायालय प्रकल्प मेरशी तिसवाडी या पत्त्यावर करावा.

अभियांत्रिकी पदव्युत्तर परीक्षेसाठी अर्ज करण्याची सूचना

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : गोवा विद्यापिठाने एप्रिल, मे २०२५ या काळात होणाऱ्या अभियांत्रिकी पदव्युत्तर (सेमिस्टर एक ते सहा) परीक्षेसाठी अर्ज करण्याची आणि परीक्षेची तारीख निश्चित केली आहे. एप्रिल, मे २०२५ ची परीक्षा २८ एप्रिल २०२५ पासून सुरू होईल. ऑफलाईन अर्ज (उशीरा शुल्काशिवाय) १७ ते २८ पर्यंत सुपूर्द केले पाहिजे. ऑफलाईन अर्ज (उशीरा शुल्क रु. ३४० सह) ४ एप्रिल २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येईल. अधिक माहितीसाठी गोवा विद्यापिठाच्या ुर्पिळसेर.रल.ळप संपर्क साधावा.

कासारपाल येथील पारंपरिक करवली उत्सवाची सांगता

टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. १८ : कासारपाल – डिचोली गावच्या ग्रामदेवी श्री सातेरी भूमिका देवस्थानच्या पारंपरिक करवली दोन दिवसांपासून सुरू असलेल्या उत्सवाची मोठ्या उत्साहाने सांगता झाली. गावच्या दोन लहान बालकांना स्त्रीवेशभूषा परिधान करतात त्याला देवीचे रूप असे म्हटले जाते. करवल्या रोमटामेळ वाजत गाजत चव्हाट्यावर येतात तत्पूर्वी त्यांची सुरुवात मंदिराकडून सुरु होते. श्रींचा आशीर्वाद आणि तेथील मान पानाकडून ओटी भरण्याचा कार्यक्रम आटोपल्यानंतर वाजत – गाजत चव्हाट्यावर नेतात त्याठिकाणी गावातील सुवासिनीकडून करवल्याची ओटी भरली जाते. हा उत्सव दोन दिवस चालू असतो. गेल्या कित्येक वर्षांपासून हा उत्सव गावची मंडळी मोठ्या उमेदीने साजरा करतात. बालगोपाळसह गावची स्त्रिया या उत्सवात मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.

जीएमसी बाहेर हजारो लिटर पाणी वाया

प्रशासनाचा निष्काळजीपणा स्पष्ट : फूटपाथवरील भेगांमधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : गोवा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल (जीएमसी) संकुलाजवळील मोठ्या प्रमाणातील पाण्याच्या गळतीमुळे सरकारी यंत्रणांचा निष्काळजीपणा समोर आला आहे. एका बाजूला संपूर्ण राज्यात तीव्र पाणीटंचाई जाणवत असताना, दुसऱ्या बाजूला मौल्यवान पिण्याचे पाणी अक्षरशः गॅलनच्या गॅलन वाहून जात आहे.

जीएमसीच्या जुन्या संकुलाला नवीन स्पेशालिटी ब्लॉकशी जोडणाऱ्या फूटपाथवरील भेगांमधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळत आहे. विशेष म्हणजे, स्वच्छ पिण्याचे पाणी साठवण्यासाठी असलेल्या किओस्कच्या मागे असलेले जुळे पाण्याचे टँकरही उघड्या पाईपमधून वेगाने पाणी सोडत असल्याचे आढळून आले आहे.

परिसरातील स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांनी वारंवार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या असल्या, तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

हे दररोज संध्याकाळी ५ वाजता सुरू होते आणि रात्रभर असेच चालू राहते. मी गेल्या महिन्याभरापासून येथे काम करत आहे आणि रोज हे दृश्य पाहतो, असे एका हॉटेलमध्ये कार्यरत असलेल्या रवींद्र यादव यांनी सांगितले.

गळती इतकी मोठी आहे की, सुमारे १०० मीटर अंतरावर पाणी साचते. हे पाणी कुठून येते, याचा कोणालाच अंदाज नाही, मात्र दररोज हीच परिस्थिती असते, अशी प्रतिक्रिया एका दुकानातील कर्मचारी अयोध्या यादव यांनी दिली.

फूटपाथवर पाणी साचल्याने दुकानदार त्रस्त झाले असून त्याचा ग्राहकांच्या संख्येवरही परिणाम होत आहे. ही परिस्थिती किमान चार महिन्यांपासून सुरू आहे. आम्ही अनेक वेळा अधिकाऱ्यांकडे तक्रार केली, पण कोणीही दखल घेत नाही. फुटलेल्या भूमिगत पाईपमुळे ही गळती होत आहे, असे आम्हाला वाटते. माझ्या दुकानासमोरील रस्ता नदीसारखा दिसतो, त्यामुळे ग्राहक दुकानात यायलाच तयार नसतात, असे एका दुकानदाराने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. आम आदमी पक्षाचे (आप) गोवा राज्याध्यक्ष अमित पालेकर यांनी या समस्येवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा परिसर सतत वर्दळीचा असतो. त्यामुळे केवळ सार्वजनिक बांधकाम विभागानेच नाही, तर आरोग्य विभागानेही या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान,सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, या समस्येकडे लक्ष दिले जात आहे आणि गळती लवकरच थांबवली जाईल.जीएमसी कॅम्पसमध्ये अंतर्गत पंपिंग यंत्रणेत काही समस्या होत्या. त्याचे निवारण करण्याचे काम सुरू आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. गोव्यासारख्या राज्यात, जिथे उन्हाळ्यात पाणीटंचाई गंभीर स्वरूप धारण करते, तिथे इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. प्रशासनाने या समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा लोकांमध्ये वाढत्या असंतोषाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे

बाणावली बीचवर भटक्या कुत्र्यांचा हल्ला ; रशियन पर्यटक जखमी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १८ : होळीच्या सुट्ट्यांच्या शेवटी बाणावली बीचवर फिरत असलेल्या एका रशियन महिला पर्यटकावर सहा भटक्या कुत्र्यांनी हल्ला करून चावा घेतल्याची घटना घडली. संध्याकाळच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे किनाऱ्यावर आंतरराष्ट्रीय पर्यटकांवर भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांचा गंभीर मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

दृष्टी मरीनच्या जीवरक्षकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कुत्र्यांना पळवून लावले आणि महिलेला प्राथमिक उपचार दिले. त्यानंतर तिला १०८ रुग्णवाहिकेमार्फत तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या तिच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. दक्षिण गोव्यातील समुद्रकिनाऱ्यांवर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांमध्ये सातत्याने वाढ होत असून, विशेषतः साष्टी मधील किनारे हल्ल्यांचे केंद्रबिंदू ठरू लागले आहेत. काही महिन्यांतच अशा अनेक घटना घडल्या असून, पर्यटकांना गंभीर दुखापती झाल्याची नोंद झाली आहे.

केळशी किनाऱ्यावर भटक्या कुत्र्यांच्या हल्लांची माहिती नोंदविण्यासाठी एक विशेष लॉगबुक ठेवण्यात आले आहे. यामध्ये पर्यटकांच्या सुरक्षिततेशी संबंधित घटना नियमित नोंदवल्या जातात.

या प्रकारांबाबत स्थानिक प्रशासन आणि पर्यटन विभाग सतर्क झाले असून, पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांनी सार्वजनिक ठिकाणी भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

पर्यटक आणि स्थानिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. मात्र, भटक्या प्राण्यांशी मानवतेच्या दृष्टिकोनातून वागताना सार्वजनिक सुरक्षिततेचे संतुलन राखणे गरजेचे आहे. परिस्थिती अधिक बिकट होण्यापूर्वी या समस्येवर तातडीने उपाययोजना केल्या पाहिजेत, असे बाणावली येथील एका स्थानिक रहिवाशाने सांगितले.

पर्यटन हितधारकांनी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे गोव्याची पर्यटनस्नेही प्रतिमा धोक्यात येऊ लागली आहे. जर पर्यटकांनी गोव्याला असुरक्षित म्हणून पाहिले, तर येणाऱ्या काळात पर्यटन व्यवसायावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारला सुधारित कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅनच्या मंजुरीची प्रतीक्षा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १७ : गोवा सरकारने राष्ट्रीय तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे (एनसीझेडएमए) सुधारित मसुदा कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन २०११ च्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवला आहे. हा मसुदा १:४००० स्केलवर आधारित असून, मंजुरी मिळाल्यानंतर स्थानिक संस्थांना सादर केला जाणार आहे. १:४००० स्केलवर सीझेडएमपी नकाशे तयार करणारे गोवा हे देशातील एकमेव राज्य ठरणार आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्यातांत्रिक छाननी समितीने २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत १ : २५००० स्केलवर तयार केलेला सुधारित मसुदा एनसीझेडएमए कडे मंजुरीसाठी शिफारस केला.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार समितीने सुधारित योजनेची शिफारस केल्यामुळे आता एनसीझेडएमए कडून मंजुरीची प्रतीक्षा आहे. मंजुरी मिळाल्यानंतर १ : ४००० स्केलवर आधारित नकाशे पुढे नेले जातील, जे चेन्नईतील नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट ने तयार केले आहेत.

सुधारित नकाशे गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला मंजुरीसाठी सादर केले जातील आणि त्यानंतर स्थानिक संस्थांना सल्लामसलतीसाठी पाठवले जातील. गोव्याने नागरिकांना अधिक स्पष्ट समजण्यासाठी १:४००० स्केलवर आधारित नकाशे तयार केले आहेत, अशी प्रक्रिया राबवणारे गोवा हे पहिले राज्य असेल.

एनसीएससीएमए ने हा आराखडा सप्टेंबर २०२२ मध्ये केंद्राला सादर केला होता आणि केंद्राने त्याची अधिसूचना जारी केली होती. केंद्राच्या निर्देशानुसार, एजन्सीने आराखड्यात आवश्यक सुधारणा केल्या आणि ऑगस्ट २०२४ मध्ये तो राज्याला सादर केला.

गोव्याने तांत्रिक तपासणी समितीकडे सुधारित योजनांना मान्यता देण्याची विनंती केली आहे. या योजनांमध्ये गोव्याच्या भुनाक्षा (कॅडस्ट्रल) योजनांचा समावेश करण्यात आला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर सीझेडएमपी –२०१९ च्या तयारीचा मार्ग मोकळा होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटीला ने एनसीएससीएमए ला बंधारे, स्लुइस गेट आणि इतर अद्ययावत माहिती समाविष्ट करून १ : २५००० स्केलवर सुधारित मसुदा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

कांदोळीमध्ये सीआरझेड उल्लंघन ? बुधवारी होणार पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

कळंगुट, दि. १८ : कांदोळी समुद्रकिनाऱ्यावरील वाळूच्या ढिगाऱ्यांवर बेकायदेशीर बांधकाम केल्याच्या तक्रारीनंतर गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी (जीसीझेडएमए) बुधवारी स्थळ पाहणी करणार आहे. कळंगुट मतदारसंघ मंचाने (सीसीएफ) एक महिन्यापूर्वी या संदर्भात तक्रार दाखल केली होती.

सीसीएफच्या म्हणण्यानुसार, व्हायकिंग मीडिया अँड एंटरटेनमेंट या संस्थेने सर्व्हे क्रमांक ११२/१९ मधील कांदोळी दांडो परिसरातील सीआरझेड क्षेत्रात बेकायदेशीर काँक्रीटचे बांधकाम केले आहे. हे बांधकाम सीआरझेड अधिसूचना आणि पर्यावरण संरक्षण कायदा च्या नियमांचे स्पष्ट उल्लंघन असल्याचा आरोप सीसीएफ ने केला आहे.

या बांधकामामुळे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या वाळूच्या ढिगाऱ्यांचे नुकसान होत आहे. यामुळे नाजूक किनारी परिसंस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असून समुद्रधूप आणि भरती–ओहोटीच्या लाटांपासून संरक्षण देणाऱ्या नैसर्गिक अडथळ्यांना धोका निर्माण झाला आहे, असे सीसीएफ ने तक्रारीत नमूद केले आहे.

सीसीएफ ने अधिकाऱ्यांना विनंती केली आहे की,या प्रकरणात तात्काळ कारवाई करून पुढील पर्यावरणीय नुकसान टाळावे आणि सीआरझेड नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करावे.

गेल्या आठवड्यात सीसीएफ ने मुख्य सचिव, जीसीझेडएमए आणि अन्य संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात, गेल्या काही वर्षांत दाखल झालेल्या तक्रारींवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप केला आहे. सीआरझेड नियम आणि ईपीए च्या उल्लंघनांवर वेळेवर कारवाई न झाल्यामुळे पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला असल्याचे सीसीएफचे म्हणणे आहे.

उल्लंघनांमुळे गोव्याच्या किनारी परिसंस्थेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. प्रलंबित तक्रारींसाठी वेळापत्रक तयार करावे, सीआरझेड आणि ईपीए नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकरणांमध्ये काम थांबवण्याचे आदेश जारी करावेत, पर्यावरणीय नुकसानीचे मूल्यांकन करावे आणि दोषींवर योग्य कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सीसीएफ ने केली आहे. सीसीएफने पुढे म्हटले आहे की, या समस्यांचे निराकरण लांबणीवर टाकल्यास पर्यावरण संवर्धनासोबतच प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण होईल.

नावेलि सिविक फोरमच्या आरोपांचे रोझरी एज्युकेशन कॉम्प्लेक्सकडून खंडन

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १८ : नावेली येथील रोझरी एज्युकेशन कॉम्प्लेक्स (आरईसी) ने नावेलि सिविक अँड कंझ्युमर फोरम (एनसीसीएफ)कडून त्यांच्या शाळेच्या विस्तार योजनांवर करण्यात आलेले आरोप फेटाळून लावले आहेत. आरईसीने स्पष्ट केले की, हा विस्तार नोंदणी वाढवण्यासाठी नसून विद्यमान विद्यार्थ्यांसाठी सुधारित सुविधा आणि चांगले शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी आहे.

आरईसीने हेराल्डला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आमच्यावर लावण्यात आलेले आरोप निराधार आहेत. शिक्षण हा कोणत्याही प्रगतीशील समाजाचा कणा आहे आणि शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांना पाठिंबा मिळायला हवा. मात्र, काही स्वार्थी व्यक्ती आणि संघटना या विकासाला अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत.

एनसीसीएफने शाळेच्या विस्तारामुळे वाहतूक कोंडी होईल, असा आरोप केला आहे. मात्र, आरईसीने हा आरोपही फेटाळला आहे. शाळेच्या विस्तारामुळे वाहतूक कोंडी होईल, हा दावा निराधार आहे. परिसरातील वाहतुकीची समस्या ही शाळेमुळे नाही तर आजूबाजूच्या निवासी संकुलांमध्ये आणि व्यावसायिक केंद्रांमध्ये झालेल्या अनियंत्रित वाढीमुळे आहे. यासाठी योग्य वाहतूक व्यवस्थापन आवश्यक आहे. मडगाव वेस्टर्न बायपासचा अधिक चांगल्या प्रकारे वापर केल्यास वाहतुकीच्या समस्येचे निराकरण होऊ शकते असे आरईसीने स्पष्ट केले.

आरईसीने नमूद केले की, प्रस्तावित शाळा विस्तार हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शी सुसंगत आहे. या धोरणानुसार सुधारित पायाभूत सुविधा, आधुनिक शिक्षण वातावरण आणि दर्जेदार शिक्षण परिणाम अनिवार्य आहेत. विद्यार्थ्यांना रा÷ष्ट्रीय मानकांशी सुसंगत दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी सुधारित वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि ग्रंथालयासह विस्तारित सुविधांची आवश्यकता आहे असे आरईसीने सांगितले.

आरईसीने आरोप केला की, एनसीसीएफच्या विरोधामागे स्वार्थी हेतू आहेत. या विरोधामागे केवळ काही असंतुष्ट घटक कार्यरत आहेत, जे विद्यार्थ्यांच्या हितासाठी नव्हे तर आपल्या स्वार्थासाठी हा विरोध करत आहेत. या संघटनेने केलेले आरोप विद्यार्थ्यांच्या हिताच्या विरोधात आहेत, असे आरईसीने नमूद केले.

वाहतूक कोंडीच्या आरोपांना उत्तर देताना आरईसीने स्पष्ट केले की, नवीन विस्तार योजनेत दोन स्तरांच्या पार्किंगची तरतूद आहे. प्रस्तावित शाळा विस्तारात बेसमेंटसह दोन स्तरांची पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्नच निर्माण होत नाही. शिवाय, कॉम्प्लेक्सच्या आजूबाजूला अतिरिक्त पार्किंगच्या सोयी उपलब्ध आहेत, असे आरईसीने सांगितले.

आरईसीने आपल्या भूमिकेवर ठाम राहण्याचे संकेत दिले आहेत. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा आणि शिक्षण देणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. काही व्यक्ती चुकीची माहिती पसरवून विरोध करत असल्या, तरी आम्ही विकासाच्या दिशेने वाटचाल सुरूच ठेवणार आहोत. शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न असल्याने कोणताही अडथळा आम्ही सहन करणार नाही, असे आरईसीने स्पष्ट केले. आपल्या मुलांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि शिक्षणाच्या विकासासाठी आपण सर्वांनी एकत्र उभे राहायला हवे असे आरईसीने जनतेला उद्देशून सांगितले.

साळ येथे गड्यांच्या रोबंटाला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १८ : साळ येथे होळीच्या पाचव्या दिवसापासून गडयांचे रोबंट श्री महादेव, श्री भूमिका पंचायतन देवस्थानचा व उभ्या केलेल्या होळीचा आशीर्वाद घेऊन सुरू झाले, हे गड्यांचे रोबंट खोलपेवाडी, कुमयामळा, साळ पुनर्वसन, कोळगीरे, वरचावाडा, मधलावाडा, न्यू वाडा, खालचावाडा अशा प्रभागातून घरोघरी फिरुन घरोघरी रयत पिलगीला शुभाशीर्वाद देत मंदिरात आल्यानंतर गडयाच्या रोबंटाचा सातव्या दिवशी समारोप होणार.

या रोबंटामध्ये गडे मंडळ सदस्य, पंचायतन देवस्थानातील (घाडी, देवळी, मडवळ, परवार आदी कुटुंबातील सदस्य) सामील झाले. प्रत्येक दारोदारी घरातील सुवासिनी पाट ठेवून त्यावर ताटामध्ये श्रीफळ, तांदूळ , फूले व रक्कम ठेवून प्रतिक्षा करतात. घाडी सदस्यांकडे असलेल्या श्रीच्या आशीर्वादाने तिचा स्विकार करतात व उपस्थित प्रत्येक सदस्याला शबय म्हणून श्रीफळ किंवा रक्कम देण्याची पारंपारिकता आहे नि जोपासली जाते, असे हे रोबंट पाचव्या दिवसापासून सुरू होऊन सातव्या दिवशी दुपारी समाप्त होणार.

यंदाच्या रोबंटामध्ये गडे सदस्य आदिनाथ परब, प्रमोद राऊत, नंदू राऊत, हनुमंत घाडी, प्रकाश घाडी, प्रतिक घाडी, विशांत घाडी, रोहन घाडी, प्रकाश घाडी, गुरु नेरुरकर , हरिश्चंद्र परवार, बाबनी परवार, परेश परवार , तन्वेश परवार व अन्य सहभागी झाले होते. तसेच देवस्थान अध्यक्ष कालिदास राऊत हे सुद्धा उपस्थित होते. हे रोबंट प्रथेप्रमाणे शुभारंभ करुन त्याचा समारोप होणार.